**''<u>प्रेस नोट</u>''** दिनांक: - २०/०१/२०२४

**'' ०४ देशी बनावटीचे स्टिलचे पिस्टल, ०८ जिवंत राऊंड, ०२ रिकामे मॅग्झीन सह विक्री करणाऱ्या ०२ गुन्हेगारास मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष-१० यांनी केले जेरबंद''**

......

दिनांक १९/०१/२०२४ रोजी कक्ष १० यांना गुप्त बातमीदाराकडुन खबर मिळाली की, बोरोसील प्लॉटच्या समोर, वसंत ओअॅसीस टॉवरच्या बाजुला, मकवाना रोड, मरोळ , अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी दोन इसम बेकायदेशिर अग्निशस्त्राची विक्री करण्यासाठी येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दिनांक १९/०८/२०२४ रोजी वर नमुद ठिकाणी कक्षाच्या अधिकारी व अंमलदाराचा सुसंगत व नियोजनबद्ध सापळा रचला होता. सदर ठिकाणी दोन इसम पाठीवर लॅपटॉप बॅग अडकवलेल्या स्थितीत आले व त्यांचे संशयास्पद हालचाल पाहून पोलीस पथकाने त्या दोघांना ताब्यात घेतले असता नमुद दोन्ही इसमांच्या झडतीत त्यांच्या कब्जातील बॅग मध्ये प्रत्येकी ०२ असे एकुण ०४ देशी बनावटीची पिस्टल(अग्निशस्त्र) व ०८ जिवंत काडतुसे व अतिरीक्त ०२ रिकाम्या स्टिलच्या मॅगझीन मिळुन आल्या. सदर आरोपीता विरोधात गुन्हा क्र.०६/२०२४ (एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, वि.स्था.गु.र.क्र. ७०/२०२४), कलम ३,२५ भाहका सह ३७(१)(अ),१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद केला. सदर गुन्हयाचा पुढील तपास मुंबई गुन्हे शाखा कक्ष १० हे करत आहे.

**हस्तगत मालमत्ता -**

१) ०४ देशी बनावटीची सिल्वर काळया रंगाचे स्टिलचे पिस्टल मॅगझिनसह, अं.कि. २,००,०००/- रु

२) ०८ पितळी आवरण असलेले जिवंत काडतुसे, अं.किं. ४,०००/- रु

३) ०२ काळया राखाडया रंगाची रेग्झिनची लॅपटॉप बॅग (सॅक), जु.वा. अं.किं. ६००/- रु

४) ०२ रिकामे स्टीलचे मॅगझीन, किं.अं. १०,०००/- रु

**एकुण किंमत- २,१४,६००/- रुपये**

**अटक आरोपीताचा तपशिल :-**

१) प्रशांत सुरेशचंद राजोरिया उर्फ राधेभाई, वय २४ वर्षे,

२) हर्ष सुभाषचंद कश्यप, वय १९ वर्षे,

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पश्चिम), श्री. महेश देसाई, यांचे मार्गदर्शनाखाली, कक्ष-१० गुप्रशा, मरोळ मुंबई येथील प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. दिपक सावंत, सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री. धनराज चौधरी, पोलीस अंमलदार पो.ह. श्री. धारगळकर, श्री. धनवडे, श्री. चिकणे, पो.शि. श्री. ठोंबरे, श्री. डफळे यांनी पार पाडली आहे.

---